# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०११०१

## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/230 /२०२३-२४ दि. 30 /०६/२०२३

## // जाहिर प्रकटन//

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात ठेका होर्डींग व खाजगी होर्डिंगधारक यांना स्थायी होर्डिंग्ज स्ट्रक्चर उभारुन जाहिरात करण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील नियम (८) फलकाची संरचनात्मक मजबुती मध्ये:-

(ख) फलक उभारणाऱ्या अभिकरणास अकल्पित उद्भवणाऱ्या दुर्घटनांच्या दायित्वांबाबत आवश्यक तो विमा सादर करावा लागेल.

(ग) जाहिरात फलकामुळे उद्भभवणाऱ्या अकल्पीत दुर्घटनेबाबत सर्व दायित्वांची जबाबदारी संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याने योग्य ती शहानिशा करून ठरवावी. अशा प्रकरणी संबंधीत जाहिरात फलकाच्या मजबूतीबाबत प्रश्न उद्भवल्यास संबंधीत अभिकरणाची जबाबदारी राहील, असे नमुद आहे.

तसेच नियम ३३ अन्वये जाहिरात लावताना वाहतूकीस तसेच पादचाऱ्यास त्रास होणार नाही, तसेच जाहिरातीच्या संरचनेमुळे कोणतीही दुर्घटना होणार नाही, याबाबत संबंधीत अभिकरणाने (एजन्सी) दक्षता घेणे बंधनकारक राहील. जाहिरातीच्या संरचनेमुळे झालेल्या कोणत्याही अपघातामुळे झालेल्या जिवित /मालमत्तेच्या नुकसानीस संबंधित अभिकरण जबाबदार राहील, असे नमुद आहे.

पिंपरी येथे सोसाट्याचा वारा व वादळामुळे होर्डींग कोसळुन अपघात होऊन पाचजणांचा मृत्यु झालेला आहे. सद्यस्थितीत कधीही वारा व वादळी पाऊस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच माहे जून २०२३ पासून पावसाळा सुरु झालेला असल्याने पावसाळयात वादळी वाऱ्यामुळे/पावसामुळे/विजेमुळे होर्डिंग्ज/फलक पडून पुणे व पिंपरी मधील अपघातांची पुनरावृत्ती होऊन अपघात होऊ शकते. सदरबाबत मा.शासनाकडून पत्रान्वये सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

त्याअनुषंगाने संबंधीत अभिकरण (एजन्सी) यांना यापुर्वीच होर्डींगची डागडुजी व दुरुस्ती करणेबाबत तसेच होर्डिंग्ज स्ट्रक्चरचे अनुभवी संरचना अभियंत्या मार्फत तपासणी करून होर्डींग सुस्थितीत असलेबाबत संरचना मजबुती प्रमाणपत्र (स्ट्रक्चर स्टॅबिलीटी) सादर करणेबाबत पत्रान्वये कळविण्यांत आले आहे.

तरी सदरच्या जाहीर प्रकटनांद्वारे, संबंधीत अभिकरण (एजन्सी) यांचे होर्डींगमुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना किंवा अपघात होऊन जिवीत अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधीत अभिकरण (एजन्सी) यांना सर्वस्वी जबाबदार धरणेत येईल व संबंधीत अभिकरण (एजन्सी) यांचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन संबंधीत अभिकरण (एजन्सी) कारवाईस पात्र राहतील. याप्रमाणे सुचना निर्गमित करण्यांत येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका